मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या
दिनांक ३१ मार्च १९९३ रोजी संपन्न झालेल्या
पाचव्या बैठकीचा [illegible] [illegible] आलेला कार्यवृत्तांत

Confirmed in the 6th meeting on 28/4/93

## मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ.

बुधवार दिनांक ३१ मार्च १९९३ रोजी झालेल्या मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या ५ व्या बैठकीचे कार्यवृत्तांत.

बुधवार दिनांक ३१ मार्च १९९३ रोजी सकाळी ११.०० वाजता मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाची ५ वी बैठक गृहनिर्माण भवनाच्या चौथ्या मजल्यावरील सभागृहात संपन्न झाली. या बैठकीस पुढील मान्यवर उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १. | डॉ. शंकर वामन मटकर | सभापती |
| २. | श्री. हेमराज शहा | उपसभापती |
| ३. | श्री. पं. दो. वाणी | मुख्य अधिकारी व मुख्य अभियंता/प्रा. |
| ४. | श्री. पोतदार, मुख्य अभियंता /मुंबई महानगरपालिका यांचे प्रतिनिधी | सदस्य. |
| ५. | श्री. विवेक भर्तू | -"- |
| ६. | श्री. मोहम्मद फारुख मन्सुरी | -"- |
| ७. | श्री. व्ही. बी. वरसंकर | -"- |
| ८. | श्री. गजेन्द्र लष्करी | -"- |
| ९. | श्री. चेतन शहा | -"- |
| १०. | श्री. आजम खान | -"- |
| ११. | श्री. श्रीकांत पाटील | -"- |
| १२. | श्री. कमलाकर शर्मा | -"- |
| १३. | श्री. शंकरराव पिटला | -"- |

बैठकीचे नियमित कामकाज सुरु होण्यापूर्वी मंडळाचे मुख्य अधिकारी श्री. पं. दो. वाणी, यांचे स्वागत करण्यांत आले. मंडळात उपमुख्य अभियंता पदावर नियुक्त झालेले श्री. ज्ञानेश्वर हडदरे व कार्यकारी अभियंता सी ३/४ या पदी नियुक्त झालेले कार्यकारी

१२४

3

अभियंता श्री. बिजलानी यांचा सदस्यांशी परिचय करून देण्यांत आला.

मा. सभापती, डॉ. शां.वा.मटकर यांचे अध्यक्षतेखाली बैठकीस प्रारंभ झाला.

बाब क्रमांक : ५.१

विषय :- दिनांक २४.२.१९९३ रोजी झालेल्या मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळाच्या चौथ्या बैठकीचा तसेच दिनांक ३.३.९३ रोजी झालेल्या जोड बैठकीचा कार्यवृत्तांत स्थायी करणे.

वरील दोन्ही बैठकीचा कार्यवृत्तांत सचिवांनी सभागृहापुढे सादर केला व कार्यवृत्तांतात दुरूस्त्या/सुधारणा सुचविण्याची विनंती केली.

श्री. विवेक भर्तू, सदस्य यांनी सूचना केली की, उपकरपात्र इमारतींचा पुनर्विकास करण्याच्याच्या संदर्भात ना हरकत प्रमाणपत्र वितरित केलेल्या प्रस्तावांच्या संदर्भात कोणती कार्यवाही झाली. यासंबधीचा अहवाल [प्रत्येक बैठकीत सादर करण्याची सूचना] गेल्या बैठकीत मान्य झाली होती. कार्यवृत्तांतात याबाबीचा उल्लेख असावा. सविस्तर चर्चेअंती ही सूचना मान्य करण्यांत आली.

मुख्य अभियंता/ मुंबई महानगरपालिका यांचे प्रतिनिधी श्री. पोतदार यांची सूचना की, पृष्ठ क्र. २९ वरील ठराव क्रमांक ४.२१ च्या अखेरीस "निष्कासित करण्या विषयी मुंबई महानगरपालिका व शासनाच्या संबधित अधिका-यांना विनंती करण्यांत यावी." असे वाक्य घालण्याची सूचना केली. सविस्तर चर्चेअंती ही सूचना मान्य करण्यांत आली.

सविस्तर चर्चेअंती वरील सुधारणांसह दि. २४.२.९३ रोजी झालेल्या चौथ्या बैठकीचा तसेच दिनांक ३.३.९३ रोजी झालेल्या जोडबैठकीचा कार्यवृत्तांत एकमताने स्थायी करण्यांत आला.

बाब क्रमांक : ५.२

विषय :- रहिवाश्यांच्या सहकारी गृहनिर्माण संस्थाचे प्रस्ताव.

१] नियोजित नाथालाल भवन सहकारी गृहनिर्माण संस्था, इमारत क्रमांक १३३, १३३ अे, १३३बी, १३३सी, व्ही.पी. रोड, मुंबई- ४.

या प्रस्तावात पृष्ठ क्र. ५१ वर एकूण रहिवाश्यांची संख्या ५५ ऐवजी ५८ करण्याची सूचना कार्यकारी अभियंता, सहकारी गृहनिर्माण कक्ष यांनी केली असतां सदस्यांनी रहिवाश्यांची यादी प्रस्तावासोबत सादर न केल्याबद्दल आक्षेप घेतला, या विषयावर सविस्तर चर्चेअंती रहिवाश्यांची यादी मुख्य अधिकारी व सभापती यांनी तपासावी व त्यानंतर सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या प्रस्तावास सभापतींनी मंजूरी द्यावी, असे ठरले.

२] नियोजित दत्तप्रसाद सहकारी गृहनिर्माण संस्था, ३४, सईद अन्निस इस्टेट, तुकाराम जावजी रोड, मुंबई- ७.

सविस्तर चर्चेअंती या सहकारी गृह निर्माण संस्थेच्या प्रस्तावास मंजूरी देण्यांत आली व पुढील ठराव मंजूर करण्यांत आले.

ठराव क्रमांक : ५.२५.१

नाथालाल भवन, इमारत क्र. १३३, १३३अे, १३३,बी, १३३सी, व्ही.पी. रोड, मुंबई-४ येथील इमारतीसह भूखंड

रहिवाश्यांच्या नियोजित नाथालाल भवन सहकारी गृहनिर्माण संस्थेसाठी संपादित करण्याच्या प्रस्तावास एकमताने मंजूरी देण्यांत आली.

ठराव क्रमांक : ५.२५.२

३४ सईदा उन्निस इस्टेट, तुकाराम जावजी रोड, मुंबई-७ येथील इमारतींसह भूखंड रहिवाश्यांच्या नियोजित दत्तप्रसाद सहकारी गृहनिर्माण संस्थेसाठी संपादित करण्याच्या प्रस्तावास एकमताने मंजूरी देण्यांत आली.

बाब क्रमांक : ५.३

विषय :- पुनर्रचित इमारतींना नवीन नांव देण्याचे प्रस्ताव.

कार्यसूचीवरील पृष्ठ क्र. ६१, २२९,२२९ वर सादर केलेल्या प्रस्तावांप्रमाणे तीन पुनर्रचित योजनांच्या अमारतींना नवीन नांव देण्याचे प्रस्तावांवर सविस्तर चर्चा झाली व ते प्रस्ताव मंजूर करुन पुढीलप्रमाणे ठराव एकमताने मंजूर करण्यांत आला.

ठराव क्रमांक : ५.२६

पुढे दर्शविलेल्या तीन पुनर्बांधणी योजनेमधील इमारतींना नांव देण्यांच्या प्रस्तावास एकमताने मंजूरी देण्यांत आली.

| अ.क्र. | पुनर्बांधणी योजना | इमारतीचे प्रस्तावित नांव. |
|---|---|---|
| १. | १८० अ, कनीया चाळ, ना. म. जोशी मार्ग, जी(द) विभाग, लोअर परळ. | साईधाम |
| २. | २३७, अ-ब, सिताराम कुंभार चाळ, साने गुरुजी मार्ग, ई विभाग. | प्रभू निवास. |
| ३. | १५६ रावते चाळ, प्रभादेवी. [illegible] विभाग. | ब्रह्म सिध्दि |

बाब क्रमांक : ५.४

विषय :- उपकरपात्र इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देण्याविषयी..

या विषयावरील चर्चेच्या वेळी मुख्य अधिकारी/ मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिले की, इमारत दुरुस्ती विषयी प्राधान्य ठरविण्याचे निकष प्राधिकरणाने नुकतेच ठरविले आहेत. या निकषांनुसार प्रत्येक इमारतीचे प्राधान्य ठरवून त्यानुसार दुरुस्तीच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देणे उचित ठरेल. सविस्तर चर्चेअंती संबधित कार्यकारी अभियंत्यांनी निकषानुसार इमारतीच्या दुरुस्तीचे प्राधान्य ठरवून प्रस्ताव दिनांक १२.४.९३ रोजी होणाऱ्या जोडबैठकीमध्ये सादर करावेत, असे ठरले.

बाब क्रमांक : ५.५

विषय :- म्हाडा अधिनियम ८८[३] अनुसार प्रमाणपत्र मंजूर करणे..

१] इमारत क्रमांक १०९-१११ भंडारी स्ट्रीट या विषयावर सविस्तर चर्चा झाली. मा. सदस्य सर्वश्री चेतन शहा, विवेक भर्तू, कमलाकर शमा, शंकरराव पिटला यांनी या चर्चेत भाग घेतला. या इमारती शेजारील ११३ भंडारी स्ट्रीट या इमारतीसह १०९-१११-११३ भंडारी स्ट्रीट अशी संयुक्त पुनर्बांधणी योजना कार्यान्वित करावी अशी सूचना सदस्यांनी केली. उपमुख्य अभियंता [द.] यांनी खुलासा केला, की, १०९-१११ भंडारी स्ट्रीट या इमारतीचे भूखंड अत्यंत छोटे आहेत. त्यामुळे पुनर्बांधणी योजना तुटीचे होण्याची शक्यता आहे. मुख्य अधिकारी यांनी स्पष्ट केले की, तुटीची पुनर्बांधणी योजना कार्यान्वित करुन मंडळावरील आर्थिक बोजा व

रहिवाश्यांची जबाबदारी वाढविणे उचित ठरणार नाही व त्यामुळे या इमारतीमधील रहिवाश्यांना इमारत दुरूस्तीसाठी प्रवृत्त करण्याविषयीचे प्रयत्न सदस्य व अधिकारी यांनी करावे असे त्यांनी आवाहन केले. सविस्तर चर्चेअंती उपमुख्य अभियंता [पु.] यांनी १०९-१११-११३ भंडारी स्ट्रीट ही संयुक्त पुनर्बांधणी योजना राबविणे शक्य आहे काय, यासंबंधीचा अहवाल तयार करून हे प्रकरण दिनांक १२.४.१९९३ च्या बैठकीत निर्णया-साठी ठेवावे, असे ठरले.

पृष्ठ क्रमांक : १७५

इमारत क्रमांक-१६ संत सेना महाराज मार्ग, या विषयावर वरीलप्रमाणे सविस्तर चर्चा होवून रहिवा-श्यांना दुरूस्ती खर्चाची अतिरिक्त रक्कम भरून दुरूस्तीसाठी उद्युक्त करावे असे ठरले. या कामी मा. सदस्यांनी विशेषत: मुंबई भाडेकरू संघाचे अध्यक्ष श्री. व्ही. बी. वरसकर यांनी पुढाकार घ्यावा असे मत व्यक्त करण्यांत आले. सविस्तर चर्चेअंती मा. सभापती यांच्या दालनांत इमारतींचे रहिवासी व सदस्य यांची बैठक आयोजित करून रहिवाश्यांना दुरूस्तीची आवश्यकता पटवून द्यावी, असे ठरले.

पृष्ठ क्रमांक : २२३

७१४ बी. पंदारे बिल्डिंग, बाबूराव जगताप मार्ग, "ई" विभाग, भायखळा.

या प्रस्तावावर सविस्तर चर्चा होवून म्हाडा अधिनियम ८८[३]अ अन्वये ही इमारत दुरूस्तीच्या प्रमाणित मर्यादे-पलिकडील आहे असे घोषित करण्याचा प्रस्ताव मंजूर करण्यांत आला.

ठराव क्रमांक : ५.२७

७१४, बी पंदारे बिल्डिंग, बाबूराव जगताप मार्ग, "ई" विभाग, भायखळा ही इमारत म्हाडा अधिनियम ८८[३]

अ या कलमान्वये आर्थिकदृष्ट्या दुरुस्ती खर्चाच्या प्रमाणित मर्यादेपलिकडे आहे असे प्रमाणपत्र देण्याच्या प्रस्तावास एकमताने मंजूरी देण्यात आली.

बाब क्रमांक : ५.७

विषय :- दिनांक १२.३.१९९३ रोजी मुंबईत झालेल्या बॉम्बस्फोटामुळे क्षतिग्रस्त झालेल्या इमारती विषयीचा अहवाल.

उपमुख्य अभियंता [उत्तर] यांनी दिनांक १२.३.९३ रोजी मुंबई शहरात झालेल्या बॉम्बस्फोटात क्षतिग्रस्त झालेल्या इमारतींची सविस्तर माहिती तसेच या इमारतींच्या दुरुस्ती-साठी केलेली कार्यवाही व इमारतीमधील रहिवाश्यांना तात्पुरती पर्यायी जागा उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही यासंबधीचा सविस्तर अहवाल सादर केला. या विषयावर झालेल्या चर्चेत सर्वश्री कमलाकर शर्मा, श्रीकांत पाटील, गजेन्द्र लष्करी या सदस्यांनी भाग घेतला. बॉम्बस्फोटामधील रहिवाश्यांना मदत करण्याच्या कामी मंडळाच्या अधिकाऱ्यांनी उचित कार्यवाही केली असतां कांही रहिवाशी आडमुठे धोरण अवलंबित आहेत असे त्यांनी निदर्शनास आणून दिले. मा. सभापतींनी प्रतिपादन केले की, त्यांनी या इमारतींना वेळोवेळी भेटी देवून तसेच सातत्याने बैठका आयोजित करुन रहिवाश्यांच्या शंकाचे निरसन केले आहे. याउपरही कांही रहिवाश्यांनी आडमुठेपणाने दुरुस्ती कामात अडथळे आणल्यास आवश्यकते-नुसार पोलिसांची मदत घेवून इमारत दुरुस्तीचे काम तांतडीने पूर्ण करण्यांत येईल. सविस्तर चर्चेअंती परिशिष्ट "अ"मध्ये दर्शविलेल्याप्रमाणे बॉम्बस्फोटातील क्षतीग्रस्त ८ इमारतींच्या अंदाजपत्रकांस व दंगलीमुळे क्षतिग्रस्त झालेल्या एका इमारतींच्या मिळून एकूण ९ इमारतींच्या दुरुस्तीच्या अंदाजपत्रकांच्या प्रस्तावास प्रशासकीय मंजूरी देण्याचा निर्णय एकमताने घेण्यात आला.

ठराव क्रमांक : ५.२८

मुंबईत झालेल्या बॉम्बस्फोटात तसेच दंगलीमुळे क्षतिग्रस्त झालेल्या परिशिष्ट "अ" मध्ये दर्शविल्याप्रमाणे एकूण ९ इमारतींच्या दुरुस्ती अंदाजपत्रकांच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देण्याचा निर्णय एकमताने घेण्यांत आला.

बाब क्रमांक : ५.१०

पुनर्बांधणी योजनांना सुधारित प्रशासकीय मान्यता देण्याचे प्रस्ताव.

उपमुख्य अभियंता [पुनर्रचना] यांनी पुढील पुनर्बांधणी योजनांना सुधारित प्रशासकीय मंजूरी देण्याविषयीचे प्रस्ताव सादर केले.

[१] ३१-३५ टेमकर स्ट्रीट "इ" विभाग

[२] २०-२२ कामाठीपुरा "इ" विभाग
१४ वी गल्ली.

उपमुख्य अभियंता [पुनर्रचना] यांनी योजनांच्या प्रत्यक्ष खर्चात वाढ होण्याविषयी सविस्तर विवेचन केले. याविषयी झालेल्या चर्चेत सर्वश्री शंकरराव पिटले, चेतन शहा, विवेक भर्तू, कमलाकर शर्मा इ. सदस्यांनी भाग घेतला. योजनेचे प्रत्यक्ष काम सुरु होत असतांनाच प्रत्यक्ष खर्चात किती वाढ होणार आहे याची पूर्व कल्पना सभागृहास सादर करावी अशी सूचना सादर करण्यांत आली व ही सूचना मान्य करण्यांत आली. सविस्तर चर्चेअंती वरील दोन्ही योजनांच्या खर्चास सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यांत आली.

ठराव क्रमांक : ५.२९.१

३१-३५ टेमकर स्ट्रीट, "इ" विभाग या पुनर्बांधणी योजनेच्या रुपये १२,०१,५१५/- [रुपये बारा लक्ष एक हजार पांचशे पंधरा] एवढ्या खर्चास सुधारित प्रशासकीय मंजुरी

देण्याचा निर्णय एकमताने घेण्यांत आला.

ठराव क्रमांक : ५.२९.२

२०-२२ कामाठीपुरा, १४ वी गल्ली "ई" विभाग या पुनर्बांधणी योजनेच्या रुपये ८,३०,५७६/- [रुपये आठ लक्ष, तीस हजार पांचशे शाहत्तर फक्त] एवढया खर्चास सुधारित प्रशासकीय मंजूरी देण्याचा निर्णय एकमताने घेण्यांत आला.

बाब क्रमांक : ५.१३.

विषय :- उपकरपात्र इमारतींच्या पुनर्विकासासाठी ना हरकत प्रमाणपत्र वितरित करण्याविषयी..

पृष्ठ क्रमांक : ३५१ ते ३८३

मुंबई शहरातील उपकरपात्र "अ" वर्गातील इमारतींच्या पुनर्विकासासाठी आतापर्यंत ११७ प्रकरणांना " ना हरकत प्रमाणपत्र " प्रदान केलेली असून याप्रकरणी प्रगतीचा अहवाल बैठकीपुढे सादर करण्यांत आला. सर्वश्री विवेक भर्तू, चेतन शहा, शंकरराव चिटला, श्रीकांत पाटील, गजेन्द्र लष्करी, कमलाकर शर्मा, या सदस्यांनी या चर्चेत भाग घेतला. सदस्यांनी निदर्शनास आणून दिले की, सदर कायदा मंजूर करतांना मुंबई शहरातील मोडकळीस आलेल्या इमारतींच्या पुनर्विकासाची जबाबदारी मालक व रहिवाश्यांनी घेवून इमारतीमधील जुन्या रहिवाश्यांचे नवीन इमारतीत पुन-र्वसन करण्याची शासनाची जबाबदारी कांही अंशी कमी करावी असे अभिप्रेत होते. परंतु या योजनेचा फायदा गरजू लोक घेत नसून अत्यंत सुस्थितीत असलेल्या इमारती पाडून त्याजागी पुनर्वसन होत असल्याचे चर्चेत सांगण्यांत आले. यावर मंडळाचे कोणत्याप्रकारचे नियंत्रण असणे आवश्यक आहे. मंडळाने यापूर्वी ना हरकत प्रमाणपत्रे दिलेल्या पुनर्विकासाच्या

योजनेची काय प्रगती आहे यासंबधीची आपली स्वतंत्र यंत्रणा नसल्यामुळे पूर्णपणे माहिती उपलब्ध होवू शकत नाही असे दिसून आले. पुनर्विकासासाठी ना हरकत प्रमाणपत्र दिल्यानंतर सर्व अटी व शर्तींची पूर्तता होते आहे काय ? व जुन्या रहिवाश्यांनी नवीन योजनेत नियमानुसार पूर्वीच्या क्षेत्रफळा एवढी जागा देवून सामावून घेण्यांत येते काय, याबाबतीतही मंडळाचे नियंत्रण असणे आवश्यक आहे असे सदस्यांनी प्रतिपादन केले.

मुख्य अधिकारी तसेच सभापती यांनी सदस्यांच्या सूचना रास्त असल्याचे मान्य केले. परंतू पुनर्विकास योजना कार्यक्रमांवर नियंत्रण ठेवण्यासाठी मंडळाकडे यंत्रणा नसल्याचे सांगितले. सविस्तर चर्चेअंती पुनर्विकास योजनेवर कोणत्या प्रकारे नियंत्रण ठेवावे यासंबधीचा प्रस्ताव तयार करण्यासाठी पुढील सदस्य व अधिकाऱ्यांची उपसमिती नेमण्याचा निर्णय घेण्यांत आला.

उपसमिती

| | |
|---|---|
| श्री. चेतन शाहा | सदस्य |
| श्री. विवेक भर्तु | सदस्य |
| श्री. कमलाकर शर्मा | सदस्य |
| उपमुख्य अभियंता [पुनर्रचना] | सदस्य, सचिव. |

या समितीने येत्या ६ आठवड्यात अहवाल द्यावा, असे ठरले.

पुनर्विकासासाठी "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान केलेल्या अकरा योजना/ इमारतींची माहिती अवलोकनार्थ बैठकीपुढे सादर करण्यांत आली. [परिशिष्ट ब]

"अ" वर्गातील उपकरपात्र इमारती च्या पुनर्विकासासाठी " ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याविषयीचे ११ प्रस्ताव बैठकीपुढे अवलोकनार्थ सादर करण्यांत आले. या प्रस्तावावर सविस्तर चर्चा झाली. सदस्यांनी तक्रार केली की, सादर केलेल्या प्रस्तावातील माहिती अपूर्ण असल्यामुळे सदस्यांना या प्रस्तावांची नीट बोध होत नाही. मुख्य अधिकारी यांनी खुलासा केला की, सदर प्रस्ताव सादर करण्यास विलंब होवू नये. यादृष्टीने प्रस्तावांची संक्षिप्त माहिती सादर करण्यांत आले आहे. यासंदर्भात मा. सदस्यांच्या सर्व शंकाचे पूर्णपणे निराकरण करण्याचे त्यांनी मान्य केले. चर्चेअंती यापुढे पुनर्विकासाच्या प्रस्तावात आता सादर केलेल्या माहिती-साठी पुढीलप्रमाणे माहिती उपलब्ध करुन द्यावी असे ठरले.

१] इमारतीचे नांव व संपूर्ण पत्ता .

२] इमारतीचा उपकर क्रमांक.

३] भाडेकरू/रहिवाश्यांची यादी व सध्याच्या सदनिकेचे क्षेत्रफळ.

या प्रस्तावावरील चर्चेच्या वेळी सदस्यांनी निदर्शनास आणून दिले की, अनु. क्र. ७ वरील प्रस्ताव म्हणजेच भूकर पहाणी क्र. २६, १/२६, २७, २८, १/२८, २९, ३० सायन विभाग या प्रस्तावात अतिरिक्त जागा मोठ्या प्रमाणात उपलब्ध होत आहे. मंडळातर्फे सदर भूखंडावर संयुक्त पुनर्बांधणी योजना राबविल्यास मंडळास सायन या मोक्याच्या ठिकाणी मोठ्या प्रमाणांत अतिरिक्त गाळे उपलब्ध होतील व संक्रमण शिबिरांतील अनेक रहिवाश्यांना या योजनेतील गाळे वितरित करणे शक्य होईल. सविस्तर चर्चेअंती मंडळातर्फे या इमारतींची पुनर्बांधणी करणे शक्य आहे काय याविषयीचा अहवाल उपमुख्य अभियंता (पुनर्रचना) यांनी सादर करुन हे प्रकरण दिनांक १२. ४. १९९३ रोजीच्या बैठकीत अंतिम निर्णयासाठी ठेवण्यात यावे असे सर्वानुमते ठरले. पुनर्विका-साच्या उर्वरित १० प्रस्तावास मंजूरी देवून मुख्य अधिकारी

यांनी यासंदर्भात पुढील कार्यवाही या सभेचे इतिवृत्त स्थायी होण्याची वाट न पाहतां करावी, असे सर्वानुमते ठरले.

ठराव क्रमांक : ५.३०

परिशिष्ट "क" मध्ये दर्शविलेल्या १० उपकरपात्र "अ" वर्गातील इमारती/ योजनांच्या प्रस्तावास ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्याविषयी एकमताने निर्णय घेण्यांत आला. व या संदर्भात मुख्य अधिकारी यांनी पुढील आवश्यक कार्यवाही या सभेचे इतिवृत्त स्थायी होण्याची वाट न पाहता करावी, असे ठरविण्यांत आले.

बाब क्रमांक : ५.१४

विषय :- अध्यक्षांच्या परवानगीने आयत्या वेळचे विषय.

[१] उत्तर परिमंडळातर्फे अँन्टॉप हिल येथील संक्रमण शिबिरांचा पुनर्विकास करण्याची योजना..

उपमुख्य अभियंता [उत्तर] यांनी वरील विषया-संबंधीची टिप्पणी पृष्ठ क्र. ३९१ वर सभागृहाच्या अवलोक-नार्थ सादर केली आहे. त्यावर सविस्तर चर्चा झाली व प्रकल्पाच्या प्रगतीची नोंद घेण्यांत आली.

[२] मा. सदस्य श्री. फारुख मन्सुरी व कमलाकर शर्मा, यांनी सूचना केली की, मंडळाची बैठक साधारणपणे तिस-या आठवडयांत घ्यावी. या सूचनेची नोंद घेण्यांत आली.

[३] मा. सदस्य श्री. गजेन्द्र लष्करी यांनी निदर्शनास आणले की, ज्या इमारतींची दुरुस्ती कामे प्रगती-पथावर आहे त्या ठिकाणी फलकांवर मंडळाचे नांव योग्य प्रकारे लिहिले जात नाही. चर्चेअंती सर्व अधिका-यांना सूचना देण्यांत आल्या की दैनंदिन

कारभारांत मंडळाचे नांव "मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळ" असे लिहावे.

४] श्री. शंकरराव पिटला, यांनी तक्रार केली की, गोरेगांव येथील संक्रमण शिबिरांत अनधिकृत स्टॉलचे अतिक्रमण झाले आहे. ही बाब वारंवार सभागृहाच्या निदर्शनास आणून दिल्यानंतरही हे स्टॉल काढण्याची कार्यवाही होत नाही. या संदर्भात मंडळास कार्यवाही करण्यास अडचणी असल्यास हे स्टॉल्स नियमित करावेत अशी त्यांनी सूचना केली. सविस्तर चर्चेअंती पुरेसा पोलिस बंदोबस्त उपलब्ध झाल्यानंतर हे स्टॉल्स काढण्याची कार्यवाही करण्यांत येईल असे मुख्य अधिकारी यांनी मान्य केले.

या चर्चेअंती बैठक संस्थागित करण्यांत आली व पुढील जोड बैठक सोमवार दिनांक १२.४.१९९३ रोजी सकाळी ११.०० वाजतां होईल, असे जाहिर करण्यांत आले. सर्व उपस्थितांचे आभार मानल्यानंतर सभा समाप्त झाल्याचे जाहिर करण्यांत आले.

(सही)

सभापती,
मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळ, मुंबई.

(१३९)

२७

" परिशिष्ठ : "अ"

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाचे दिनांक ३१.३.९३ रोजी झालेल्या ५ व्या बैठकीत मंजूर केलेल्या मुंबई शहरातील बॅम्बस्फोटात तसेच दंगलीमुळे क्षतीग्रस्त झालेल्या इमारतींच्या दुरुस्ती अंदाजपत्रकांची यादी.

| अ.क्र. | पृष्ठ क्र. | इमारतीचे नांव | विभाग. |
|---|---|---|---|
| १. | २११ | ४ अ अन्नपुर्णा भवन एन.सी. केळकर मार्ग. | फा/उ |
| २. | २१३ | २५६ सी. शिपाई सेवा ट्रस्ट जुनी मिरांडा चाळ )सेना भवन पथ, दादर. | फा/उ |
| ३. | २१५ | १५ एच. मोहमदी मंझील, एन.सी. केळकर मार्ग. | फा/उ |
| ४. | २१७ | ११ अ खटाउ मॅन्शन, गोखले रोड [दादर] | फा/उ |
| ५. | २१९ | २५९ अ. वो. पुपाला सदन, डॉ. ॲनी बेझंट रोड. | फा/द |
| ६. | २२१ | २६० रामोदीया मॅन्शन डॉ. ॲनी बेझंट रोड. | फा/द |
| ७. | ३८५ | २६२ आर्शिवाद बिल्डींग. डॉ. ॲनी बेझंट रोड. | फा/द |
| ८. | ३८७ | २५८ मांजरेकर सदन, डॉ. ॲनी बेझंट रोड. | फा/द |
| ९. | ३८९ | १२७ सी ~~मस्कारे~~ मालवाडे बिल्डींग. दादासाहेब फाळके रोड. | फा/द |

" परिशिष्ठ "क "

दिनांक ३१.३.९३ च्या जोडबैठकीत "अ" वर्गातील उपकरप्राप्त इमारतींच्या पुर्नर्विकासासाठी " ना हरकत प्रमाणपत्रे" प्रदान करण्याबाबत मंजूरी दिलेल्या प्रस्तावांची यादी.

| अ.क्र. | पृष्ठ क्र. | प्रस्तावाचे नांव |
|---|---|---|
| १. | ३७३ | भूकर पहाणी क्रमांक ४५७ भुलेश्वर विभाग चंदन वाडी "क" विभाग. |
| २. | ३७५ | भूकर पहाणी क्र. १००९ खेतवाडी बॅक रोड गिरगांव विभाग. |
| ३. | ३७५ | अंतिम भुखंड क्र. ३० नगररचना योजना क्र. ३, सेनापती बापट मार्ग माहिम विभाग. |
| ४. | ३७५ | अंतिम भुखंड क्र. १०३६ नगररचना योजना क्र. ४, माहिम विभाग. |
| ५. | ३७७ अ | भूकर पहाणी क्र. १३२७ फोर्ट विभाग, ९०- पेरीन नरिमन स्ट्रीट. |
| ६. | ३७७ | अंतिम भुखंड क्र. ३२०-३२१ नगररचना योजना क्र. ४ ; माहिम विभाग, जावळेवाडी, दादर. |
| ७. | ३७९ | अंतिम भूखंड क्र. ७२२, नगर रचना योजना क्र. ३, माहिम विभाग, वाघमारे बिल्डींग. |
| ८. | ३७९ | अंतिम भूखंड क्र. ८१३, नगर रचना योजना क्र. ४, माहिम विभाग, |
| ९. | ४०७ | अंतिम भूखंड क्र. १२५०, नगररचना योजना क्र. ४, माहिम विभाग, नागपेकर पथ, प्रभादेवी, मुंबई. |
| १०. | ४०७ | अंतिम भूखंड क्र. ३५० नगररचना योजना क्र. ४, माहिम विभाग, "दगडीवाडी" दादर, मुंबई- |

(93)

39

मुं ब ई इ मा र त दु रु स्ती व पु न र्र च ना मं ड ळ

कार्यवृत्तांत.

मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळाची ५ वी जोड बैठक सोमवार, दिनांक १२ एप्रिल १९९३ रोजी सकाळी ११.०० वाजता गृहनिर्माण भवनातील तिस-या मजल्यावरील सभागृहात संपन्न झाली. या बैठकीस पुढील मान्यवर उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १] | डॉ. शंकर वामन सटकर | सभापती |
| २] | श्री. हेमराज शहा | उपसभापती |
| ३] | श्री. पं. दो. वाण्नी | मुख्य अधिकारी |
| ४] | श्री. पोतदार, मुंबई महानगरपालिका प्रतिनिधी. | सदस्य. |
| ५] | श्री. व्ही. बी. वरसकर | -"- |
| ६] | श्री. कमलाकर शर्मा | -"- |
| ७] | श्री. शंकरराव पिटला | -"- |
| ८] | श्री. विवेक भर्तू | -"- |
| ९] | श्री. चेतन शहा | -"- |
| १०] | श्री. महम्मद आझम खान | -"- |
| ११] | श्री. फारूख मन्सुरी | -"- |
| १२] | श्री. गजेन्द्र लष्करी | -"- |
| १३] | श्री. श्रीकांत पाटील | -"- |
| १४] | श्री. रॉकी क्रिस्टो | -"- |

सभापती डॉ. शंकर वामन सटकर, हे बैठकीच्या अध्यक्षस्थानी होते. ५ व्या बैठकीतील कार्यसूचीवरील दुरूस्ती अंदाजपत्रकासंबंधी पटणी समिती च्या अहवालानुसार प्राधान्य ठरवून सदर अंदाजपत्रके मंजूर करण्यासाठी आजची जोडबैठक आयोजित केली आहे, असे अध्यक्षांनी सभागृहास सांगितले व सभेच्या नियमित कामकाजास सुरवात झाली.

करण्यात येते. इमारतीत ८८[३] अन्वये प्रमाणपत्र दिल्यानंतर वास्तुशास्त्रज्ञांची नियुक्ती पुनर्बांधणी प्रस्तावाच्या आराखड्यास मुंबई महानगरपालिकेतर्फे मंजूरी, मंडळाची, प्रशासकीय मान्यता, शासनाची मंजूरी, भूसंपादन कार्यवाही या प्रक्रिया कायद्यातील तरतुदींनुसार पूर्ण कराव्या लागतात व जमीन मंडळाच्या प्रत्यक्ष ताब्यात आल्यानंतरच प्रत्यक्ष पुनर्बांधणी योजना हाती घेण्यात येते. अनेक प्रकरणात घरमालक, दुकानदार, भाडेकरु न्यायालयात जातात, स्थगिती आदेशामुळे पुढील कार्यवाही करता येत नाही. वरील सर्व प्रक्रिया करण्यास किमान ३ ते ५ वर्षाचा कालावधी जात असल्याने ८८[३] प्रमाणपत्र दिल्यानंतर त्वरित पुनर्बांधणी योजना हाती घेणे शक्य नसते. श्री. शंकरराव पिटला यांनी असे निदर्शनास आणून दिले की, तात्या घारपुरे पथ येथील एका इमारतीस ८८[३] अन्वये प्रमाणपत्र दिल्यानंतर मा. सदस्यांनी वेळोवेळी पाठपुरावा करुनही पुनर्बांधणी प्रस्ताव मुंबई महानगरपालिकेस प्रस्ताव सादर करण्यात दिरंगाई होत आहे. या संदर्भात उपमुख्य अभियंता [पुनर्रचना] यांनी खुलासा केला की इमारतीच्या भूखंडाचे प्रॉपर्टी कार्ड प्राप्त होण्यास अडचणी येत असल्यामुळे या योजनेचे आराखडे मुंबई महानगरपालिकेकडून मंजूर होत नाहीत. या संदर्भात उपमुख्य अभियंता [पुनर्रचना] यांनी वैयक्तिक स्तरावर कार्यवाही करण्याचे मान्य केले. पर्यंअंती प्रस्तावित केलेल्या दोन इमारतींना ८८[३]अ अन्वये प्रमाणपत्र देण्याचा प्रस्ताव मंजूर करण्यात आला व पुढील ठराव एक मताने मंजूर करण्यात आले.

ठराव क्रमांक : ४.२०.१ :

१०९-१११ भंडारी स्ट्रीट सी १/२ विभाग ही इमारत म्हाडा अधिनियम ८८[३]अ या उपकलमान्वये आर्थिकदृष्टया, दुरुस्ती खर्चाच्या प्रमाणित मर्यादेपलिकडे आहे असे प्रमाणपत्र देण्याच्या प्रस्तावास एकमताने मंजूरी दिली.

ठराव क्रमांक : ४.२०.२

३९१ बी, विठ्ठलभाई पटेल रोड, ग्रँट रोड डी विभाग, मुंबई- ४ ही इमारत म्हाडा अधिनियम ८८[३]अ अन्वये आर्थिक दृष्टया दुरुस्ती खर्चाच्या प्रमाणित मर्यादे-पलिकडे आहे असे प्रमाणपत्र देण्याच्या प्रस्तावास एकमताने मंजूरी देण्यांत आली.

दाव क्रमांक : ४.८

विषय :- संकल्पित सुधारित अंदाजपत्रका-बाबत माहिती देणारी टिपण्णी.

या विषयावर सविस्तर चर्चा झाली. सविस्तर चर्चेअंती पुढील इमारतींची सदस्यांनी संबधित अधिका-यांसह संयुक्त पहाणी करावी असे ठरले.

| | इमारत | सदस्य |
|---|---|---|
| १. | ३१८-३२० राजा राममोहन रॉय मार्ग, डी-१ विभाग. | श्री. शंकरराव पिटले. |
| २. | २-८ पहिला पारसीवाडा डी-२ विभाग. | श्री. श्रीकांत पाटील |

या विषयाच्या संदर्भात सादर केलेल्या बाबटिप्पणीची नोंद घेण्यांत आली व पुढील इमारतींची सुधारित अंदाजपत्रके सादर करण्यास अनुमती देण्यांत आली.

| | | |
|---|---|---|
| १. | ११ मिर्झा अली स्ट्रीट | "ब" विभाग |
| २. | ६९, मेमनवाडा, | "ब" विभाग |
| ३. | ३१८-३२० राजा राममोहन रॉय मार्ग [ सदस्यांच्या पहाणीनंतर] | डी-१ विभाग |
| ४. | ७२, नानुभाई देसाई रोड, | डी-२ विभाग |
| ५. | २-८ पहिला पारसीवाडा | [सदस्यांच्या पहाणीनंतर] डी-२ |
| ६. | १५८-१८० खोताचीवाडी वॅक रोड | डी-२ विभाग. |
| ७. | २५-२७ खेतवाडी ७वी गल्ली | डी-२ विभाग |

बाब क्रमांक : ५.१

अनुपालन अहवाल

पृष्ठ क्रमांक : ४२९

मा. सदस्य श्री. श्रीकांत पाटील यांनी सांगितले की, इमारत क्र. २.८ पहिला पारसी वाडा, डी-२ विभाग या इमारतीची त्यांनी पहाणी करुन इमारतीची वाढीव दुरुस्ती योग्य असल्याचे मत व्यक्त केले आहे. मात्र टिप्पणीत उल्लेख केल्याप्रमाणे अंदाजपत्रक योग्य असल्याचे मत त्यांनी व्यक्त केलेले नाही. या विषयावर सविस्तर चर्चा झाली. सविस्तर चर्चेअंती पृष्ठ क्र. ४२९ वरील केलेली कार्यवाही या रकान्यात सादर करण्यांत आलेले सुधारित अंदाजपत्रक ऐवजी "वाढीव दुरुस्ती" अशी सुधारणा करावी, असे सर्वानुमते ठरले.

पृष्ठ क्रमांक : ४२९ अ :

२४ नबीबुल्ला स्ट्रीट या इमारतीच्या पुनर्बांधणीच्या शक्यतेविषयी उपमुख्य अभियंता (पुनर्रचना) यांनी सादर केलेल्या टिप्पणीवर सविस्तर चर्चा झाली. सविस्तर चर्चेअंती निर्णय घेण्यांत आला की, इमारतीमधील रहिवासी दुरुस्तीच्या प्रमाणीत मर्यादेपेक्षा जास्त होणाऱ्या खर्चाची रक्कम भरण्यास तयार असतील, तर या इमारतीच्या दुरुस्ती कामास सुरवात करावी व पुढीलप्रमाणे ठराव मंजूर करण्यांत आला.

ठराव क्रमांक : ५.३१

२४ नबीबुल्ला स्ट्रीट, सी १/२ विभाग या इमारतीच्या दुरुस्ती अंदाजपत्रकात प्रमाणित मर्यादेपलीकडील खर्चाची रक्कम रहिवाश्यांनी भरण्याच्या अटींवर प्रशासकीय मंजूर देण्यांत आली.

बाब क्रमांक : ५.२

विषय :- इमारत क्रमांक १४-१९ बिडीवाला चाळ, नर्दुल्ला टँक रोड, जी (उत्तर) विभाग या पुनर्बांधणी योजनेस सुधारित प्रशासकीय मंजुरी देण्याविषयी.

उपमुख्य अभियंता [पुनर्रचना] यांनी पृष्ठ क्रमांक ४३१ वर सदर प्रस्ताव सादर केलेला आहे. कार्यकारी अभियंता, पु. वि. ३ यांनी सदर योजनेस झालेल्या विलंबाची तसेच प्रत्यक्ष खर्चात झालेल्या वाढीची कारणे सभागृहास सांगितली. मुख्य अधिकारी यांनी सर्व सदस्य यांच्या शंकाचे निरसन केल्यानंतर सदर योजनेस सुधारित प्रशासकीय मंजूरी देण्याचे एक मताने ठरले.

ठराव क्रमांक : ५.३

इमारत क्र. १४-१९ बिडीवाला चाळ, नर्दुला टँक रोड, जी [उत्तर] विभाग या पुनर्बांधणी योजनेच्या अंदाजित रुपये ५९ लाख एवढ्या खर्चाच्या रक्कमेस सुधारित प्रशासकीय मंजूरी देण्याचा निर्णय एकमताने घेण्यात आला.

बाब क्रमांक : ५.४

विषय :- उपकर पात्र इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता.

......

वरील विषयाचे संदर्भात उपमुख्य अभियंता [दक्षिण] यांनी पृष्ठ क्र. ४४५ वर सविस्तर टिप्पणी सादर केली आहे. मुख्य अधिकारी यांनी स्पष्टीकरण केले की या टिप्पणीनुसार ३ प्रकारची अंदाजपत्रके सादर केली आहेत. मंडळाने पूर्वी दिलेल्या आदेशानुसार दुरुस्तीची अंदाजपत्रके उपमुख्य अभियंता [मुख्यालय] यांनी तपासून बैठकीपुढे सादर केली आहेत. याचा तपशिल पृष्ठ क्र. ४४९ ते ४५५ वर सादर केला आहे. दिनांक ३१.३.९३ रोजी बैठकीत दिलेल्या आदेशानुसार पटणी समितीच्या अहवालातील मार्गदर्शक तत्वानुसार गुणानुक्रम ठरवून दुरुस्तीचे प्राधान्य निश्चित करून अंदाजपत्रके बैठकीत सादर करणे. याचा सविस्तर तपशिल पृष्ठ क्र. ४५७ ते ४६१ अ तसेच पृष्ठ क्र. ५३५ ते ५४३ वर सादर केला आहे. दुरुस्ती खर्चास सुधारित प्रशासकीय मंजूरी देण्याचे प्रस्ताव उपमुख्य अभियंता [मुख्यालय] यांनी तपासून सादर करण्याची

सूचना पूर्वीच्या बैठकीत दिलेली आहे. त्यानुसार सुधारित अंदाजपत्रकांना प्रशासकीय मंजूरी देण्याचे प्रस्ताव ४६१ ब ते ४८३ व पृष्ठ क्र. ५४५ वर सादर केले आहेत. या प्रस्तावांवर सविस्तर चर्चा झाली. चर्चेअंती उपमुख्य अभियंता [मुख्यालय] यांनी तपासणी करुन शिफारस केलेल्या परिशिष्ट "अ" मधील १७ दुरुस्ती प्रस्तावांना प्रशासकीय मंजूरी देण्याचा निर्णय एकमताने घेण्यांत आला.

निर्णय क्रमांक : ५.३३

परिशिष्ट "अ" मध्ये दर्शविलेल्या १७ इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तींच्या अंदाजपत्रकांना प्रशासकीय मंजूरी देण्याचा निर्णय एकमताने घेण्यांत आला.

पृष्ठ क्रमांक ४५९ ते ४६१ वर इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीचे दक्षिण परिमंडळातील १९ प्रस्ताव सादर केले आहेत. पटणी समितीच्या मार्गदर्शक तत्वानुसार पुढील प्रस्तावांना दुरुस्तीचे प्राधान्य देता येते.

| अ.क्र. | इमारत | विभाग. |
|---|---|---|
| ८. | ३३ एच मुगभाट क्रॉस लेन | डी-१ |
| १२. | १५-२१ बोरा बाजार स्ट्रीट | अ. |
| १३. | ३२३-३२५ शहीद भगतसिंग मार्ग | सी १/२ |
| १४. | १९१ ई कॅव्हेल क्रॉस रोड. | सी-३/४ |
| १५. | ३४ सारंग स्ट्रीट | ब |
| १६. | ११२ भुलेश्वर रोड | सी १/२ |
| १८. | ४, राचन वाडी, गांवदेवी | डी १ |
| १९. | १३-अ अर्देशिर दादी क्रॉस लेन | सी १/२ |

वरील इमारतींच्या दुरुस्ती प्रस्तावांना प्रशासकीय मंजूरी देण्याचा निर्णय घेण्यांत आला. मुख्य अधिकारी यांनी स्पष्टीकरण केले की, पटणी समितीच्या अहवालानुसार पुढील इमारतींच्या दुरुस्तीस प्राधान्य देण्याची आवश्यकता

नसली तरी पण या इमारतींचा विशिष्ट भाग धोकादायक अवस्थेत असल्यामुळे इमारतींच्या विशिष्ट भागास तातडीने दुरुस्ती करण्याची आवश्यकता आहे. त्यामुळे पुढीलप्रमाणे दोन इमारतींच्या दुरुस्तीच्या प्रस्तावास मंजूरी देण्यांत यावी असे त्यांनी प्रतिपादन केले.

| अ.क्र. | इमारत | विभाग |
|---|---|---|
| ५. | ८१ दादीशेठ अग्यारी लेन | सी. ३/४ |
| ६. | ३२२ सी, जे. एस. एस. रोड | सी ३/४ |

सविस्तर चर्चेअंती वरील इमारतींच्या दुरुस्तीच्या अंदाजपत्रकांना प्रशासकीय मंजूरी देण्याचा निर्णय घेण्यांत आला.

पृष्ठ क्र. ५३५ ते ५४३ वर उत्तर परिमंडळातील दुरुस्ती अंदाजपत्रके सादर केली आहेत. त्यापैकी पुढील इमारतींची पहाणी समितीच्या अहवालानुसार प्राधान्याने दुरुस्ती करण्याची आवश्यकता आहे असे सांगण्यांत आले.

| | | |
|---|---|---|
| ४. | ४५५ भिकू निवास, विर सावरकर मार्ग. | फग[दक्षिण] |
| ५. | १२३ वेलिंग्टन हाऊस डॉ. आंबेडकर मार्ग | फग /द |
| ६. | २०६ लक्ष्मी कोर्ट वडाळा | फग/उ |
| ७. | १३१, किर्ती महल, माटुंगा रोड, नं. ४ | फग/उ |
| ८. | २१७, ना.म. जोशी मार्ग, | फग/द |
| १०. | १६ डोलकर स्ट्रीट | ई-१ |
| ११. | १३१ अ पानबाई निवास साने गुरुजी मार्ग. | ई-२ |
| १२. | १० अ फौतवाला बिल्डिंग | फग/द |
| १४. | १०० अ.बी. अभरफेख मार्ग | फग/द |
| १५. | हररखवाला बिल्डिंग, साने गुरुजी मार्ग. | फग/द |

| १. | २. | ३. |
|---|---|---|
| १६. | ५५८–५६२ मस्जिद चाळ डॉ. ई. मोझेस रोड | फग/द |
| १७. | १६५ सी. एम. ए. रोड | ई–२ |
| १८. | ३५ कामाठीपुरा १० वी गल्ली | ई–२ |
| १९. | ३०–३२ बंदूकवाला चाळ नं. १ सयानी रोड | फग/द |
| २०. | एम. टी. चाळ क्र. ४ डॉ. मोझेस रोड | फग/द |
| २१. | ३७, कामाठीपुरा, ६ वी गल्ली | इ–२ |
| २ | ५६, पी. उमर मॅन्शन केशवराव खाडे मार्ग | इ–२ |
| २३. | ७६–७८ अ. बी. सी. केशवराव खाडये मार्ग. | इ–२ |
| २४. | सद्गुरु निवास सखाराम लाजिकर मार्ग | ई–२ |
| २५. | १९ पहिली पहिली धेलाबार स्ट्रीट | ई–२ |
| २६. | ३०१–३०९ बाबासाहेब आंबेडकर मार्ग. | ई–१ |
| २७. | १२ अ. अ. डी. पी. वाडी (६ वाडावाला चाळ) | ई–१ |
| २८. | ११४–७४ कामाठीपुरा १ ली गल्ली. | इ–२ |

वरील इमारतींच्या दुरुस्तीच्या अंदाजपत्रकांना प्रशासकीय मंजूरी देण्याचा निर्णय घेण्यांत आला.

ठनिर्णय क्रमांक : ५.३८

परिशिष्ट "ब" मध्ये दर्शविलेल्या ३३ इमारतींना प्राधान्याने संरचनात्मक दुरुस्तीच्या अंदाजपत्रकांना एकमताने प्रशासकीय मंजूरी देण्यांत आली.

सुधारित अंदाजपत्रकांना प्रशासकीय मंजूरी देण्याविषयी सदर प्रस्ताव पृष्ठ क्र. ४६१ ब ते ४८३ व पृष्ठ क्र. ५४५ वर सादर

केले आहेत. या विषयावर सविस्तर चर्चा झाली. मूळ कार्यसूचीमधील पृष्ठ क्र. १०१ वरील तक्त्यामध्ये कांही गणिती स्वरूपाच्या दुरुस्त्या असल्याचे सदस्यांनी निदर्शनास आणून दिले. या दुरुस्त्यांची नोंद घेण्यांत आली. पृष्ठ क्र. ४७३ अ वर काम मंडळातर्फे सुरु होणार आहे असा उल्लेख आहे. या संदर्भात उपमुख्य अभियंता [दक्षिण] यांनी खुलासा केला की, पूर्वी दुरुस्तीसाठी ना हरकत प्रमाणपत्र दिले होते. ते काम बंद पडल्यामुळे आता मंडळातर्फे काम सुरु करण्यांत येणार आहे. सदर खुलाशामुळे सदस्यांचे समाधान झाले व असा सविस्तर खुलासा टिप्पणीत असावा, अशी सूचना करण्यांत आली. पृष्ठ क्र. ४७५ वर तिस-या टप्प्याचा संभाव्य खर्च दर चौ.मी. रु. ३७४.२३ दर्शविलेला आहे. त्याऐवजी रुपये ६७४.२३ अशी दुरुस्ती करावी असे कार्यकारी अभियंता "अ" विभाग यांनी सांगितले. या दुरुस्तीची नोंद घेण्यांत आली. सविस्तर चर्चेअंती परिशिष्ट "क" मध्ये दर्शविलेल्या ९ इमारतींच्या दुरुस्तीच्या सुधारित अंदाजपत्रकांना प्रशासकीय मंजूरी देण्याचा निर्णय घेण्यांत आला.

ठराव क्रमांक : ५.३५

परिशिष्ट "क" मध्ये दर्शविलेल्या ९ इमारतींच्या दुरुस्तीच्या सुधारित अंदाजपत्रकास प्रशासकीय मंजूरी देण्याचा निर्णय एकमताने घेण्यांत आला.

बाब क्रमांक : ५.८.२

विषय :- "अ" वर्गातील उपकरपात्र इमारतींच्या पुनर्विकासासाठी " ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याबाबत.

सदर प्रस्ताव पृष्ठ क्र. ४९१ ते ५३१ व ५४७ ते ५५७ वर सादर केले आहेत. त्यावर सविस्तर चर्चा झाली. दिनांक ३१.३.१९९३ रोजी झालेल्या बैठकीत भूकर क्र. २६/१, २६, २७, २८, २९ व ३० सायन विभाग ही पुनर्बांधणी योजना मंडळातर्फे

राबविल्यास किती अतिरिक्त गाळे उपलब्ध होतील यासंबंधीचा अहवाल सादर करण्याची सूचना केली होती. त्यानुसार अहवाल पृष्ठ क्र. ४९३ वर सादर केला आहे. त्यावर सविस्तर चर्चा होवून या योजनेचा पुनर्विकास करण्यास मालमत्ताधारकांस ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्यास मंजूरी देण्यांत आली.

अन्य प्रस्तावांच्या संदर्भात सदस्यांनी तक्रार केली की, प्रस्तावासोबत सादर केलेली माहिती अपुरी असून त्यामुळे सदस्यांना प्रस्तावाविषयी सविस्तर माहिती मिळत नाही. मुख्य अधिकारी यांनी खुलासा केला की, दिनांक ३१.३.१९९३ रोजी झालेल्या बैठकीत ठरल्यानुसार माहिती सादर केली आहे. या संदर्भात सन्माननीय सदस्यांना आवश्यक असलेली अधिक माहिती बैठकीत देण्यांत येईल व सर्वांच्या शंकांचे निरसन करण्यांत येईल. तरी पण सदस्यांनी पूर्वीप्रमाणे सविस्तर तपशिल सादर करावा असा आग्रह धरला. मुख्य अधिकारी यांनी स्पष्ट केले की, सदस्यांच्या मागणीनुसार सविस्तर प्रस्ताव सादर करण्यांचा प्रयत्न करता येईल. मात्र बैठकीपूर्वी उपलब्ध वेळ तसेच मंडळाकडील यंत्रणा लक्षांत घेता प्रस्ताव मंडळापुढे मंजूरीसाठी सादर करण्यास थोडासा विलंब होईल. सविस्तर चर्चेअंती परिशिष्ट "ड" मध्ये दर्शविलेल्या ९ मालमत्तेच्या पुनर्विकासासाठी मालमत्ताधारकांस ना हरकत प्रमाणपत्र वितरित करण्याचा निर्णय घेण्यांत आला. त्याचप्रमाणे कार्यवृत्तांतात स्थायी होण्याची वाट न पाहतां या संदर्भात मुख्य अधिकारी यांनी पुढील कार्यवाही करावी, असा ही निर्णय घेण्यांत आला.

ठराव क्रमांक : ५.३६

परिशिष्ट "ड " मध्ये दर्शविलेल्या ९ मालमत्तेच्या पुनर्विकासासाठी मालमत्ताधारकांस ना हरकत प्रमाणपत्र देण्याच्या प्रस्तावास एकमताने मंजूरी देण्यांत आली. यासंदर्भात मुख्य अधिकारी, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ यांना

याप्रकरणी कार्यवृत्तांत स्थायी होण्यापूर्वी पुढील कार्यवाही करण्याचे अधिकार देण्य ांत यावेत असाही निर्णय एकमताने घेण्यांत आला.

बाब क्रमांक : ५.८.१

तांत्रिक समितीच्या मंजूरीसाठी टिप्पणी.

......

३८०, बी. जगन्नाथ शंकरशेठ मार्ग, सी ३/४ विभाग या इमारतीसंबधीची टिप्पणी उपमुख्य अभियंता [दक्षिण] यांनी पृ.क्र.४८५ वर सादर केली आहे. यासंदर्भात खुलासा करण्यांत आला की, विभाग अधिकारी, सी विभाग, मुंबई महानगरपालिका यांनी पत्र क्र. ८२२ दिनांक १०.५.९१ अन्वये कळविले आहे की, सदर इमारतीचा ताबा मुंबई महानगरपालिकेने घेतला असून इमारत रिकामी करण्याविषयी नोटीसा दिलेल्या आहे. त्यामुळे सदर इमारत दुरुस्ती करण्या ची जबाबदारी मुंबई महानगरपालिकेची आहे.

श्री. शंकरराव पिटला, मा. सदस्य यांनी प्रतिपादन केले की, ही इमारत पूर्वी उपकरपात्र होती व रहिवाशांनी दुरुस्ती उपकर भरलेला आहे. शिवाय या इमारतीस म्हाडा अधिनियम ८८[३]अ अन्वये प्रमाणपत्रही दिले आहे. मुंबई महानगरपालिका या इमारतीच्या बाबतीत दुरुस्तीची कोणतीही कार्यवाही करीत नसून इमारतीमधील रहिवाशयांचे जीवित धोक्यांत येवू शकते. त्यामुळे विशेष बाब म्हणून या इमारतीची दुरुस्ती मंडळाने करावी अशी त्यांनी विनंती केली.

या संदर्भात सविस्तर चर्चा झाली. चर्चेअंती श्री. शंकरराव पिटला यांची विनंती अमान्य करण्यांत आली. व पुढील निर्णय घेण्यांत आले.

[१] या इमारतीस उपकलम ८८[३] अ अन्वये प्रमाणपत्र दिले आहे काय, याची खात्री करुन घेणे.

[२] इमारतीचा दुरुस्ती उपकर रद्द करण्याविषयीचा प्रस्ताव संबंधितांना सादर करणे.

[...] दायक अवस्थेत असल्यामुळे या इमारतीमधील रहिवाश्यांची अन्यत्र पर्यायी व्यवस्था करण्याविषयी मा. सभापती यांचे स्तरावर मुंबई महानगरपालिकेच्या पदाधिका-यांना पत्र लिहिले.

पृष्ठ क्रमांक-४८९-वर सादर केलेल्या इमारत क्र. ३१८-३२० राजा राममोहन रॉय मार्ग या इमारत तिच्या तिसऱ्या टप्प्यांच्या दुरुस्ती अंदाजपत्रकासंबंधी सादर केलेल्या टिप्पणीची नोंद घेतली व मंजुरी देण्यात आली.

बाब क्रमांक : ५.८.३

अध्यक्षांच्या परवानगीने आयत्या वेळचे विषय.

......

[१] श्री. चेतन शहा, मा. सदस्य यांनी सूचना सादर केली की, शेरिफ देवजी स्ट्रीट ही इमारत पूर्वी ना हरकत प्रमाणपत्राद्वारे दुरुस्ती करण्यांत येत होती. दंगलीमध्ये ही इमारत बहुतांशी जळलेली आहे. त्यामुळे विशेष बाब म्हणून या इमारतीचे ना हरकत प्रमाणपत्र रद्द करुन दुरुस्तीचे काम मंडळातर्फे करण्यांत यावे.

मुख्य अधिकारी यांनी या संदर्भात खुलासा केला की, दंगलीमध्ये हानी पोहोचलेल्या इमारतींचा दुरुस्ती खर्च रुपये ७५०/- प्रति चौ. मी. हून अधिक येत असल्यास त्या अतिरिक्त खर्चाचे अनुदान शासनाकडून मिळणार किंवा नाही या विषयी कोणतेही लेखी आदेश प्राधिकरणास प्राप्त झालेले नाहीत. त्यामुळे मंडळास फक्त प्रमाणित मर्यादेएवढा दुरुस्ती खर्च करता येईल.

या विषयावर सविस्तर चर्चा झाली व असे ठरले की, या संदर्भात मा. सभापती यांचे स्तरावर शासनास पत्र पाठवावे व इमारतीची विशिष्ट परिस्थिती लक्षांत घेता प्रमाणित मर्यादेपेक्षा जास्त होणा-या अतिरिक्त दुरुस्ती खर्च अनुदान शासनाने प्राधिकरणास विनाविलंब देण्याविषयी विनंती करावी.

[३] श्री. व्ही. बी. वरसकर, मा. सदस्य यांनी सूचना केली की, पुनर्रचित-इमारतीमधील अनधिकृत भाडेकरूंना नियमित करण्याविषयी प्राधिकरणाच्या निर्णयानुसार सध्या आकारण्यांत येणारे शुल्क व दंड यांची रक्कम फार मोठी असून त्यामुळे बरेचसे रहिवासी गाळे-नियमित करण्यासाठी पुढे येत नाहीत. या दंडाच्या रक्कमेत कांही सूट देण्याविषयी त्यांना विनंती केली.

मुख्य अधिकारी यांनी खुलासा केला की, सदर दंड आकारण्याचा निर्णय प्राधिकरणाने घेतलेला असून त्यांत बदल करण्याचा अधिकार मंडळास नाही. सविस्तर चर्चेअंती पुढील-प्रमाणे ठराव एकमताने मंजूर करण्यांत आला.

ठराव क्रमांक : ५.३७

ठरावाद्वारे प्राधिकरणांस विनंती करण्यांत येते की,

[१] पुनर्रचित इमारतीमधील अनधिकृत रहिवाश्यांना नियमित करण्यासाठी मुंबई गृहनिर्माण मंडळाच्या नियमांच्या धर्तीवर दंडाची एकत्रित रक्कम रुपये १५०००/- ते २५०००/- एवढी असावी.

[२] आकारण्यांत येणा-या व्याजाचा दर १२% ऐवजी ६% असावा.

[३] दंडाची व व्याजाची रक्कम भरण्यास ९० दिवसांचा कालावधी देण्यांत यावा.

ठराव बहुमताने मंजूर.

मा. सभापती, उपसभापती व सदस्यांचे आभार मानल्यानंतर अध्यक्षांचे परवानगीने सभा समाप्त झाल्याचे जाहिर करण्यांत आले.

सभापती,
मुंबई दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ,
मुंबई.

(५८)

९३

मुंबई इमारत दुरुस्ती ... चे दिनांक १२.४.९३ रोजी झालेल्या ५ व्या बैठकीच्या ... लेली उपकरप्राप्त इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या मंजूरी दिलेल्या प्रस्तावांची यादी.

| अ.क्र. | पृ.क्र. | इमारतीचे नांव | विभाग. |
|---|---|---|---|
| | | दक्षिण परिमंडळ [सुधारीत प्रस्ताव] | |
| १. | ९९ | ३५२-३५४ अ बेलासीस रोड | डी२ |
| २. | १०३ | ४४-५० डॉ. भडकमकर मार्ग | डी२ |
| ३. | १०७ | १०-१५ नवीवाडी | सी३-४ |
| ४. | ११३ | ११-१९ जालभाई स्ट्रीट. | डी१ |
| ५. | ११७ | १०७ व्ही. पी. रोड | डी१ |
| ६. | १२३ | ४२९-४३७ एस. व्ही. पी. रोड | डी१ |
| ७. | १२७ | २-१६ जेल रोड | ब |
| ८. | १३१ | २१३-२१५ डॉ. भडकमकर मार्ग | डी२ |
| ९. | १३५ | १७-२३ फॉकलंड रोड | ब |
| १०. | १३९ | १३३ अ. व री बाबुला टँक रोड | ब |
| ११. | १४७ | १ ली मोतीबाई लेन | डी२ |
| १२. | १५३ | ३ पहिली कुंभारकोट लेन | डी१ |
| १३. | १५७ | ८४ भुलेश्वर रोड | सी१-२ |
| १४. | १६१ | ७८-८० ट्रिनिटी स्ट्रीट | सी३-४ |
| १५. | १६५ अ | ६९ मेमनवाडा | ब |
| १६. | ३३५ | १५९ खेतवाडी बँक | डी२ |
| १७. | ४१९ | २२-२४ सॅम्यूअल स्ट्रीट. | ब |

१५०

५५

## परिशिष्ट "ब"

मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळाचे दिनांक १२.४.९३ रोजी झालेल्या जोडबैठकीत मंजूर केलेली उपकरप्राप्त इमारतींच्या संरचनात्मक दुरूस्तीच्या मंजूरी दिलेल्या प्रस्तावांची यादी.

| अ.क्र. | पृष्ठ क्रमांक | इमारतीचे नांव | विभाग |
|---|---|---|---|
| १. | ७७ | ३३ एच, सुगभाट क्रॉस लेन | डी१ |
| २. | ८७ | १५-२१ बोरा बाजार स्ट्रीट | अ |
| ३. | ८९ | ३२३-३२५ शहिद भगतसिंग रोड<br>२३, कोचीन स्ट्रीट | अ |
| ४. | ९१ | १९१ इ केवळ क्रॉस लेन नं. ९ | सी ३/४ |
| ५. | ९३ | ३४ सारंग स्ट्रीट | ब |
| ६. | ९५ | ११२ भुलेश्वर रोड | सी १/२ |
| ७. | ४६५ | ७४, राघववाडी | डी१ |
| ८. | ४६३ | १३ अ अर्देशिर डॅडी क्रॉस लेन | सी १/२ |
| ९. | ७१ | ८१, दादीशेठ अग्यारी लेन | सी ३/४ |
| १०. | ७३ | ३२२ सी. जे. एस. एस. रोड | सी ३/४ |
| | | **उत्तर परिमंडळ.** | |
| ११. | २६५ | ४५५ भीकू निवास वीर सावरकर मार्ग | फ/द |
| १२. | २६९ | १२३ वेलिंग्टन हाऊस, डॉ. बाबासाहेब आंबेडकर रोड. | फ/द |
| १३. | २७१ | २०६ लक्ष्मी कोर्ट वडाळा | फ/उ |
| १४. | २७३ | १३१ किर्ती महल माटूंगा रोड नं. ७ | फ/द |
| १५. | २८१ | २१७ ना.म. जोशी मार्ग | फ/द |
| १६. | २८३ | ३१६ डोलकर स्ट्रीट | इ१ |
| १७. | २८५ | १३१ पानबाई निवास साने गुरुजी मार्ग | इ२ |
| १८. | २८७ | १०अ फितवाला बिल्डिंग | फ/द |
| १९. | २९१ | १०० अ. बी. अमर शेख मार्ग | फ/द |
| २०. | २९३ | हर हरवाला बिल्डिंग नं. २ साने गुरूजी मार्ग. | फ/द |

that the roo
me as per my/o
spective documents
asis and do the need

| १. | २ | ३ | ४. |
|---|---|---|---|
| २१. | २९५ | ५५८–५६२ मस्जीद चाळ, डॉ. इ. मोझेस रोड. | फा/द |
| २२. | २९७ | १६५ सी. एम. ए. रोड | इ२ |
| २३. | २९९ | ३५ कामाठीपुरा १० वी लेन | इ२ |
| २४. | ३०१ | ३०–३२ बंदुकवाला चाळ नं. १, सयानी रोड | फा/द |
| २५. | ३०३ | ॲम. टी. चाळ नं. ४, डॉ. मोझेस रोड | फा/द |
| २६. | ३०५ | ३७, कामाठीपुरा ६ वी गल्ली | इ२ |
| २७. | ३०७ | ५६ पी. उमर मॅन्शन केशवराव खाडे मार्ग | इ२ |
| २८. | ३०९ | ७६–७८ ॲ. बी. सी. केशवराव खाडे मार्ग | इ२ |
| [illegible] | ३१३ | सद्गुरु निवास सखाराम लाजिकर मार्ग | फा/द |
| ३०. | ३१५ | १९ पहिली बेलासिस स्ट्रीट | इ२ |
| ३१. | ३२५ | ३०१–३०९ बाबासाहेब आंबेडकर मार्ग<br>११०–११० ॲ. सेठ मोतीशा लेन | इ१ |
| २. | ३२७ | १६ डी. पी. वाडी, ६ वाडावाला चाळ | इ१ |
| ३. | ३२९ | ११४–७४ कामाठीपुरा दुसरी गल्ली | इ२ |

१४२

"परिशिष्ट"क"

मुंबई इमारत दुरूस्ती व पुनर्रचना मंडळाचे दिनांक १२.४.९३ रोजी झालेल्या ५ व्या बैठकीच्या जोड बैठकीत मंजूर केलेली उपकरप्राप्त इमारतीच्या संरचनात्मक दुरूस्तीच्या मंजूरी दिलेल्या प्रस्तावाची यादी.

| अ.क्र. | पृष्ठ क्रमांक | इमारतीचे नांव | विभाग |
|---|---|---|---|
| | | **दक्षिण परिमंडळ** | |
| १. | ४६९ | ६० डॉ. आत्माराम मर्चंट रोड | सी ३/४ |
| २. | ४७१ | ४४-५२ पाकमोडीया स्ट्रीट | सी १/२ |
| ३. | ४७५ | १३९-१४७ पी. एन. स्ट्रीट | अ |
| ४. | ४७५ अ | ३०३ शहिद भगतसिंग रोड | अ |
| | | **उत्तर परिमंडळ** | |
| ५. | ३३९ | ५८३ इ, ना. म. जोशी मार्ग, | इ२ |
| ६. | ३४७ | ६७ कामाठीपुरा ११ वी गल्ली | इ२ |
| ७. | ३२७ | १६ हॉस्पिटल लेन | इ१ |
| ८. | ३३१ | ३०५-४०९ डायमंड मॅन्शन गणपत कदम मार्ग. | फ/द |
| ९. | [illegible]१ | मनिषा बिल्डिंग ग. द. आंबेकर मार्ग | फ/द. |

(१५३)

-८९

" परिशिष्ट "ड"

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या दिनांक १२.४.१९९३ रोजी झालेल्या पांचव्या जोडबैठकीत "अ" वर्गातील उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकासासाठी "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्या-विषयी मंजूरी दिलेल्या प्रस्तावांची यादी.

| अ.क्र. | पृष्ठक्रमांक | प्रस्तावाचे नांव. |
|---|---|---|
| १. | ४९३ | भूकर क्रमांक २६, १/२६, २७, २८, २९ आणि ३० सायन विभाग. |
| २. | ४९९ | अंतिम भूखंड क्र. ७६८, नगररचना योजना क्र. ४ माहिम विभाग, ४२, कॉलेज गल्ली, दादर |
| ३. | ५०३ | अंतिम भूखंड क्र. ३६८, नगर रचना योजना क्र. ४ माहिम विभाग, इ.क्र. ३ व ३बी [दादर गल्ली] दादर, "पाठारे ब्लॉक" |
| ४. | ५०७ | भूकर पहाणी क्र. १७६, माहिम विभाग इ.क्र. ३९-३१-३२ अ, ३४, माहिम कापडबाजार क्रॉस रोड |
| ५. | ५११ | भूकर पहाणी क्र. ४/५१९, मलबार हिल विभाग, २९, एफ, ई. २९ एन, २९ जी, ऑगष्ट क्रांती मार्ग. |
| ६. | ५२१ | भूकर पहाणी क्र. ५/५१९, मलबार हिल विभाग, इ.क्र. २९डी, २९ जे, २९ आय, २९ के, ऑगष्ट क्रांती मार्ग. |
| ७. | ५२७ | भूकर पहाणी क्र. ६/५१६, मलबार हिल विभाग, इ.क्र. २९ पी, १४, २९ एच, ४५ के, २९ एल, ऑगष्ट क्रांती मार्ग. |
| ८. | ५४९ | भूकर पहाणी क्र. १/३९७ [भाग] माझगांव विभाग, १०७- एच. मोतीशा लेन माझगांव. |
| ९. | ५५३ | भूकर पहाणी क्र. १ ०३ [दक्षिण] दादर नायगांव विभाग, इ.क्र. ९५ ई. नायगांव क्रॉस रोड, दादर [पूर्व] |

सचिव
मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ

सभापती
मुंबई इमारत दुरुस्ती पुनर्रचना मंडळ